14 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरूण भारत





कोल्हापूर : पंडित रवीशंकर शुक्ल युनिव्हर्सिटी छत्तीसगड विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी सादर केलेले सावन बारीश लोकनृत्य. दुसऱ्या छायाचित्रात गणपत युनिव्हर्सिटीने गणपत विद्यानगर, गु
लोकनृत्य' सादर करताना विद्यार्थिनी.

# लोकनृत्याच्या तालावर थिरक

## आदिवासी, चरिया, डप्प यासह अन्य नृत्यकलेला उत्स्फूर्त प्रतिसाद : प्रेक्षकांची गर्दी ; आज होणार समारोप

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये वीर नर्मदा साऊथ गुजरात युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले चित्तथरारक 'आदीवासी नृत्या"ने उपस्थितांचे श्वास रोखून ठेवले. तर कृष्णा युनिव्हर्सिटी आंध्रप्रदेशच्या टीमने सादर केलेल्या 'डाकूडान्स" या लोकनृत्याच्या तालावर तरूणाई थिरकली. युवा महोत्सवातील अन्य स्पर्धकांनी या नृत्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. लोकनृत्याचे उत्कृष्ट सादरीकरण आणि लयबद्ध संगीताने युवा महोत्सवाचा तिसरा दिवस रंगतदार बनवला. गेली तीन दिवस सुरु असलेल्या राष्ट्रीय ३२ व्या आंरविद्यापीठीय युवा महोत्सवाचा समारोप आज मंगळवारी सकाळी १० वाजता होणार आहे.

विद्यापीठांनी सादर केलेल्या लोकनृत्यांपैकी वीर नर्मदा साऊथ गुजरात युनिव्हर्सिटी व कृष्णा युनिव्हर्सिटी आंध्रप्रदेशने सादर केलेल्या लोकनृत्याच्या तालावर प्रेक्षकांनीही ताल धरला. लोकनृत्याला उपस्थितांनी दिलेल्या टाळ्यांची व शिट्यांची दाद यामुळे शिवाजी विद्यापीठचा परिसर दणाणुन गेला. लोप पावत चाललेल्या पारंपरिक लोकसंस्कृतीचा वारसा तरूणाईने पुढच्या पिढीपर्यंत नेऊन पोहचवला. एकूण १५ विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक उत्कृष्ट नृत्य सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली.

युवा महोत्सवात १५ विद्यापीठांनी आपआपल्या भागातील लोकनृत्य



कोल्हापूर : लोकनृत्य पाहण्यासाठी लोककला केंद्रात रसिकांनी अशी गर्दी केली.

### लोकनृत्य पाहण्यासाठी झाली गर्दी

व्यासपीठावरील लोकनृत्य पाहून इतर विद्यापीठातील स्पर्धक विद्यार्थी-विद्यार्थीनींबरोबर शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी ठेका धरला होता. ठिकठिकाणी एकत्रितपणे नृत्य करण्यात विद्यार्थी रमले होते. तर हौशी कोल्हापुरकरांनी लोकनृत्य पाहण्यासाठी लोककला केंद्रात प्रचंड गर्दी केली होती. लोककला केंद्रात अलोट गर्दी झाली होती.

सादर करून
केला. यामध
राजस्थानच्या
सादर करून
फेडले. तर
तिरूवनंतपुरम,
केलेल्या 'सर्प



गरबा रासलीला' सादर केल्या. तिसऱ्या छायाचित्रात कुरुक्षेत्र युनिव्हर्सिटी कुरूक्षेत्र हरियाणाच्या टीमने 'हरियाणी

# तरुणाई



द्विगुणीत
विद्यापीठ
' नृत्य,
चे पारणे
ने केरला
ने सादर
नी उठून

**अभिनेते सयाजी शिंदे यांच्या उपस्थितीत आज समारोप**

शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात 'राष्ट्रीय युवा महोत्सव(शिवोत्सव-२०१७)चा समारोप मंगळवार १४ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे. अभिनेते सयाजी शिंदे, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांच्या प्रमुख उपस्थिती दर्शवणार आहेत. प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे अध्यक्षस्थानी आहेत.

टाळ्या, शिट्यांनी उत्स्फुर्तपणे दाद दिली. तसेच कुरूक्षेत्र युनिव्हर्सिटी कुरूक्षेत्र हरियाणाच्या टीमने 'हरियाणी लोकनृत्य', पंडीत रवीशंकर शुक्ल युनिव्हर्सिटी छत्तीसगड विद्यापीठाने 'सावन बारीश नृत्य', युनिव्हर्सिटी ऑफ म्हैसूर कर्नाटकच्या टीमने 'डोलू' नृत्य, गणपत युनिव्हर्सिटीने गणपत विद्यानगर गुजरातच्या टीमने 'गर्भा रासलीला', विश्व भारती शांतीनिकेतन वेस्ट बंगालच्या टीमने 'रायवंशी नृत्य', मणिपूर युनिव्हर्सिटी मणिपूरच्या मनिपुरी, विनोब्रा भावे युनिव्हर्सिटी झारखंडच्या टीमने 'दांडीया' असे एकसे बड कर एक नृत्याविषकाराने कोल्हापुरची सायंकाळ रमणीय झाली. विद्यापीठ परिसर टाळया शिट्यांनी दणाणून गेला होता.



कोल्हापूर : वीर नर्मदा साऊथ गुजरात युनिव्हर्सिटीच्या टीमने सादर केलेले लोकप्रसिध्द आदिवासी नृत्य.

# शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचारावर भाष्य

## 'स्कीट'स्पर्धेतून विविध विषयांचे मांडले वास्तव : शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सव: अन्य कलाप्रकारांनाही प्रतिसाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्कीट, स्पॉट फोटोग्राफी, रांगोळी, शास्त्रीय नृत्य या कलांच्या माध्यमातून युवामहोत्सवात सोमवारी विद्यार्थ्यांनी राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षणातील भ्रष्टाचाराचे चित्र मांडले. 'कब होगी सुबह' यासारख्या विविध विषयावर 'स्कीट'(विडंबनात्म नाटक) स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादच्या विद्यार्थ्यांनी राजकीय क्षेत्रात चाललेला भ्रष्टाचार, अनैतिक व्यवहार आदी विषयांवर विडंबनात्मक भाष्य केले. कलात्मक दृष्टिकोनातून अचूक व सूचक पद्धतीने मांडलेला विचार यामुळे विद्यार्थ्यांचे सादरीकरण अतिशय प्रभावी झाले. रांगोळी स्पर्धा, शास्त्रीय नृत्य यातून राष्ट्रीय पातळीवर असणारे कलेतील वैविध्य पहावयास मिळाले.

भाषाभवनमध्ये झालेल्या 'कब होगी सुबह' या विषयावरील 'स्कीट' स्पर्धेत एकूण १५ विद्यापीठांनी सहभाग नोंदवला होता. बनस्थली विद्यापीठ राजस्थानच्या विद्यार्थ्यांनी राजकीय नेते सर्वसामान्य जनतेचा मतांसाठी कसा वापर करतात. निवडणुकीमधील घोषणा हवेतच विरून जातात. आणि निवडून आल्यानंतर स्वतःची पोळी भाजून घेतात. सर्वसामान्य जनतेच्या स्वप्नांचा मात्र चुराडा कसे करतात. त्यानंतर सर्वसामान्य जनतेला राजकारणाचा वीट येतो, आणि तो राजकारणापासून कसा दुरावला जातो, याची कल्पकतेने मांडणी केली होती. पंजाब ॲग्रीकल्चर युनिव्हर्सिटी पंजाब, लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी पंजाब आदी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक अनोखे विषय घेऊन सादरीकरण केले.'कॉमेडी स्कीट'ही सादर झाले.

केरळच्या महात्मा गांधी विद्यापीठाने 'निश्चलनीकरण' या विषयावर भाष्य करणारी नाटीका सादर केली. तर केरळच्याच शंकराचार्य विद्यापीठाने 'लॉटरी तिकीट' ही विनोदी नाटीका सादर केली. यामध्ये केरळमधील एका बाजारपेठेत भाजीविक्रेत्या मुला-मुलीत प्रेमसंबध निर्माण होतात. मात्र त्यांना मुलीच्या आईचा विरोध होत असतो.

पान ४ पहा





कोल्हापूर : 'स्कीट' स्पर्धेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादच्या विद्यार्थ्यांनी राजकीय क्षेत्रावर विडंबनात्मक भाष्य केले. स्पॉट पेंटिंगमध्ये ग्रामीण भागातील दैनंदिन जीवन रेखाटताना एक स्पर्धक. (छाया : रियाज ट्रेनर)



रांगोळी स्पर्धेत संस्कार भारती रांगोळी साकारताना एक स्पर्धक.

# कलेतील वैविध्याचे झाले दर्शन

पान १ वरून

याच दरम्यान हे प्रेमी युगल एक लॉटरी तिकीट खरेदी करतात, अन जिंकतात देखील. मात्र या लॉटरीवरुन प्रचंड गदारोळ होतो. अशा या कथेचे विनोदी पद्धतीने सादरीकरण केले रसिकांनी याला दाद दिली. मध्यप्रदेशच्या सागर विद्यापीठाने 'अंतिम इच्छा' हे नाटक, तर उत्तर प्रदेशच्या दिनदयाल विद्यापीठाने 'अफवा' या नाटकातून रेल्वे स्टेशनवर सापडलेल्या बेवारस बॅगेवरून झालेला गदारोळ सादर केला आहे. झारखंडच्या रांची विद्यापीठाने विडंबनात्मक नाटिका सादर केली.

संगीतशास्त्र विभागामध्ये झालेल्या रांगोळी स्पर्धेत १३ विद्यापीठातील स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. 'पारंपरिक रांगोळी' या विषयावर जलरंग, रांगोळी व रंगीत तांदळापासून संस्कार भारती आकर्षक रांगोळी साकारली. तसेच १३ विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी रांगोळीच्या माध्यमातून आपआपल्या भागातील पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडवले.



परिसरातील जैवविविधता आदींचे क्षण टिपले. शास्त्रीय नृत्यातून १५ विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी

14 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# निसर्गाशी एकरुप करणारे 'देवकर्मा' नृत्य

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

नैसर्गिक साधनसंपत्तीने नटलेल्या छत्तीसगढ राज्यातील मानवी जीवन निसर्गाशी एकरुप झालेले आहे. इथली शेती, आदिवासींचे जगणे सर्वकाही निसर्गावरच अवलंबून आहे. त्यामुळे इथल्या प्रत्येक उत्सवात निसर्गावरची गाणी असतात. देवारकर्मा आणि काचा ही तेथील लोकनृत्ये निसर्ग आणि मानव यांच्यातील नाते दृढ करणारी आहेत. युवा महोत्सवात छत्तीसगढच्या विद्यार्थ्यांनी ही नृत्ये सादर केली.

छत्तीसगडमध्ये चैत्र महिन्यात 'देवीगीत' गीतावर नृत्य करण्याची परंपरा आहे. याचवेळी लग्नसराईला सुरुवात होत असते. त्यामुळे लग्नामध्येही हे नृत्य सादर केले जाते. तसेच पहिल्या पावसाचा आनंद 'भोजली' नृत्यावर लुटला जातो. हे नृत्य सादर करताना छत्तीसगडचे नागरिक पाऊस आल्याच्या आनंदात चिंब होऊन जातात. दिवाळीला गौरा–गौरीबरोबर 'सुवा राऊत' नृत्य सादर केले जाते. फाल्गुनमध्ये होळीच्यावेळी 'नगाडा' जातीच्या लोकांमध्ये 'फाग' गीत गाण्याची परंपरा आहे. तर शेतात काम करताना सुवा, कर्मा, ददरिया ही गीते गायली जातात. पावसाच्या परतीनंतर सर्व गावकरी मिळून नाचा या लोकनृत्याचे आयोजन करतात. याप्रसंगी मोठया मैदानावर जत्रा भरते. त्यामुळे मैदानावर सर्वजण नाचा लोकनृत्याबरोबर सरहुल नृत्य करतात.

पान ४ पहा

## निसर्गाशी एकरूप करणारे 'देवकर्मा' नृत्य

पान १ वरून

छत्तीसगडच्या कोणत्याही आनंदाच्या क्षणी नाचा लोकनृत्य केले जाते. देवारकर्मा नृत्याला ढोलक, मोहरी, दफडा, गुदुम, टिमकी, मोदर, हार्मोनियमची साथ दिली जाते.

छत्तीसगडचे लोककलेतील माहीर पद्मभूषण हबीब तनवीरने 'नाचा लोकनृत्याचा' अभ्यास करून त्याचा प्रचार आणि प्रसार देश–विदेशभर केला आहे. त्यांचा 'नाचा लोकनृत्या'तील अभ्यास पाहूनच सरकारने त्यांना पद्मभूषण या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

महाराष्ट्रातील 'लावणी'प्रमाणे छत्तीसगडच्या 'नाचा लोकनृत्या'ची वेगळी ओळख आहे. इंदिरा कलासंगीत विश्वविद्यालय (खैरगड) मध्ये पदवी प्रथम वर्षापासूनच देशभरातील सर्व कला, संस्कृतीचा अभ्यास शिकवला जातो. त्यामुळे छत्तीसगडच्या लोकांना मध्यप्रदेश, राजस्थान, गुजरात, उत्तरप्रदेश, महाराष्ट्रातील सांस्कृतिक, वेशभूषा, खाद्यपदार्थ, रिती–रिवाज, परंपरांची ओळख किंवा जाण असते.


14 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India

# JUST BEAT IT

Rahul Gaikwad




A folk dance competition in progress on the Shivaji University campus on Monday as part of the 32nd inter-university youth festival, Shivotsav-2017. The festival will be concluding with the prize distribution ceremony on Tuesday

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 FEB 2017
तरुण भारत



सायबर महाविद्यालयात आयोजित 'झिंग टू के -१७' या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत विद्यार्थिनींनी लोकनृत्य सादर केले.

# 'सायबर'मध्ये सांस्कृतिक स्पर्धा

**कोल्हापूर :** सायबर महाविद्यालयात आयोजित 'झिंग टू के-१७' या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

उद्योगपती वीरेंद्रसिंह घाटगे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना सांस्कृतिक वारसा जपण्याचे आवाहन केले. यावेळी पथनाट्य, लोकनृत्य, कोड जाम, बिझनेस प्लॅन, कोड झिला, स्टाईल आयकॉन, ट्रेझर हंट, जिनीयस, पीक स्पार्क, ब्रेन स्टॉर्मिंग या स्पर्धा झाल्या. यावेळी संचालक डॉ. एम. एम. अली, विश्वस्त डॉ. व्ही. एम. हिलगे, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. रेवती पाटील, डॉ. एस. पी. रजपूत, प्रा. किर्ती महाजन, प्रा. रेणुका तुरंबेकर उपस्थित होते. (प्रतिनिधी)

14 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India

# Univ ropes in experts to train PG docs

Yogita.Rao@timesgroup.com

**Mumbai:** Postgraduate doctors will now have an opportunity to get trained under some top supra-specialist doctors practising at different hospitals in the state.

The expertise and innovation of these doctors in surgical and medical techniques, which are not part of the regular curriculum, will be made available to post-graduate doctors in the form of a year-long fellowship.

At least 15 doctors have agreed to train four to five young doctors annually, and also devise curricula based on their unique skill sets. The fellowship course, an initiative by Maharashtra University of Health Sciences (MUHS), will be implemented with help from doctors in the state this year and will be taken to the national level by roping in top doctors from other states too. The move, aimed at creating more specialists in the state, will be spearheaded by the university vice-chancellor Dilip Mhaisekar.

Registrar of MUHS, KD Chavan, said that the state plans to offer up to 15 such specialized fellowship courses. "There are emerging fields in medical science which are not covered in the regular curriculum. Doctors who have agreed to work with the government have their own unique skill sets and are renowned in their area of practice. We would like to provide this expertise to our students," said Chavan, adding that the university wants to start the programme this year.

The fellowship programme will be offered to post-graduate students at reasonable fees from August 1 this year. Students are likely to be selected on the basis of an entrance test conducted by MUHS. Colleges affiliated to MUHS, keen to offer these courses independently, can apply by February 20.

Dr Ramakanta Panda, cardiovascular thoracic surgeon and vice-chairman of Asian Heart Institute, said, "Dr Devi Shetty [ cardiac surgeon] and I have done this kind of curriculum work together earlier too. Considering the high disparity between ideal and existing doctor-to-patient ratios in India, I'd like to applaud the new fellowship course planned by MUHS. Most senior doctors of my time would like to be part of this."

Dr Abhay Bang, social activist and researcher working in community health centre in Gadchiroli, said, "The greatest education in the world is watching the masters at work. Students have a lot of theoretical knowledge, but in practicals their knowledge is limited. We hope young doctors, who want to work in rural health care sector but do not have expertise, to benefit from this fellowship."

Dr Aparna Hegde, an expert in urogynaecology, who was approached by the state, said there are hardly any fellowships in India in the field.

"I intend to create one that will follow internationally set guidelines. The International Association of Urogynaecology is helping me. I'm interested in creating a three-year fellowship with research and rural posting," said Hegde.

## ON THE PANEL

**SOME DOCTORS WHO WILL DESIGN THE FELLOWSHIP PROGRAMMES**

**Jayashree Todkar** (bariatric surgery) | **Anand Nadkarni** (community mental health) | **Anand Bang** (nutrition) | **C Deopujari** (neurosurgery) | **Shekhar Bhojraj** (spine surgery) | **Ravindra Vora** (paediatric surgery) | **Ashish Kubde** (gynaecology) | **Amit Maydeo** (gastroenterology)

14 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# उद्योग-शैक्षणिक संस्थांमध्ये समन्वय महत्त्वाचा

## डॉ.डी.वाय.पाटील पॉलिटेक्निकमधील कार्यशाळेत उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञांचे मत

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

एकीकडे कुशल मुनष्यबळ हवे असल्याचे उद्योगक्षेत्रात सांगितले जाते. तर दुसरीकडे शिक्षण घेऊनही नोकरीच्या शोधात असणाऱ्यांची संख्या वाढत आहे. यासाठी उद्योग आणि शैक्षणिक संस्थामध्ये समन्वय असणे महत्त्वाचे आहे, असे मत उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले.

कसबा बावडा येथील डॉ.डी.वाय. पाटील पॉलिटेक्निकमध्ये विद्यार्थ्यांसाठी उदयोग व शैक्षणिक संस्था समन्वय विभागाच्या वतीने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करताना तज्ज्ञांनी मत व्यक्त केले. या कार्यशाळेत रेनेट्रॉन कंपनीचे मॅनेजींग डायरेक्टर राजेश पिरळकर, अनिल एंटरप्रायझेसचे टेक्निकल मॅनेजर जय चव्हाण, झंवर ग्रुपचे सॉफटवेअर ॲडमिनीस्ट्रेटर प्रसाद कौलवकर, कसबेकर बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्सचे विश्वजीत जाधव यांनी कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरी मिळायची असेल तर नेमकी कोणती कौशल्ये विद्यार्थ्यांकडे असावीत, याबाबत त्यांनी उदाहरणांसह उहापोह केला. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे देऊन त्यांच्या शंकांचे निरसन केले.

प्रास्ताविकात प्राचार्य महादेव नरके यांनी, विद्यार्थ्यांसाठीच्या उपक्रमांचा आढावा घेतला. ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभागप्रमुख प्रा.नितीन माळी यांनी स्वागत केले. यावेळी उपप्राचार्य रमेश रणदिवे, उपप्राचार्या मिनाश्री पाटील, असिस्टंट रजिस्ट्रार अनिल देशिंगे, प्रा. महेश रेणके, अक्षय करपे, सुवर्णा टोणे, श्रध्दा जोशी आदींसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.




**कोल्हापूर : कसबा बावडा येथील डॉ. डी. वाय. पाटील पॉलिटेक्निकतर्फे आयोजित कार्यशाळेत बोलताना राजेश पिरळकर. सोबत जय चव्हाण, विश्वजीत जाधव, प्राचार्य महादेव नरके, प्रसाद कौलवकर, उपप्राचार्य रमेश रणदिवे आदी.**

# कल्पनेच्या शिंपल्यातून उमटले स्वप्नमोती



शास्त्रीय नृत्याच्या विविध कलाप्रकारांचे शास्त्रोक्त सादरीकरण करून रसिकांची मने जिंकली.



स्पॉट पेंटिंग स्पर्धेत महात्मा गांधी युनिव्हर्सिटीचे चित्रकार वाल्लाख पी. र. यांनी हे चित्र रेखाटले.

कोल्हापूर : 'कल्पनेच्या शिंपल्यातून, टेकिले जे स्वप्नमोती; उमलुनी सौंदर्य त्यातून, बहरली तवरूप ज्योती; स्वप्न अन् सौंदर्य जणू, साकार तव देहात आहे.' या उक्तीची प्रचिती सोमवारी शिवाजी विद्यापीठात आयोजित ३२ व्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय 'शिवोत्सव' युवा महोत्सवातून आली. महोत्सवाच्या चौथ्या दिवसाची सुरुवातच रांगोळी, लघुनाटिका, चित्रकला, शास्त्रीय नृत्य स्पर्धेने झाली.

संगीत व नाट्यशास्त्र विभागात सकाळी रांगोळी स्पर्धेने झाली. पारंपरिक रांगोळी हा विषय स्पर्धकांना देण्यात आला होता. राजस्थान, गुजरात, बिहार, चंदीगड, महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यांतील संस्कृतीचे दर्शन विद्यार्थ्यांनी रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून हुबेहूब दर्शविले. त्याची छायाचित्रे आपल्या मोबाईलमध्ये उतरविण्यासाठी अनेकांची धडपड सुरू होती.

स्पर्धेत नागपूर, केरळ, तिरुपती, मुंबई, वनस्थळी, पटियाळा, मणिपूर, आसाम, छत्तीसगड, हरियाणा, भोपाळ, पंजाब, पुणे, वाराणसी येथील विद्यापीठातील स्पर्धकांनी शास्त्रीय नृत्याच्या विविध कलाप्रकारांचे शास्त्रोक्त सादरीकरण करून रसिकांची मने जिंकून घेतली. भरतनाट्यम, कुचिपुडी, मोहिनीअट्टम, मणिपुरी, कथ्थक, कथ्थकली, आदी शास्त्रीय नृत्यप्रकारांचे या विविध प्रांतातील विद्यार्थ्यांनी मनोहारी दर्शन घडविले.

भाषा भवन येथील वि. स. खांडेकर सभागृहात लघुनाटिका हा कला प्रकाराला पहिल्या सत्रात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. त्यामध्ये मध्यप्रदेश येथील डॉ. हरिसिंह गौर विश्वविद्यालय सागर विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी 'अंतिम इच्छा' नावाची लघुनाटिका सादर केली. या नाटिकेमधून कल्पना विश्वाच्या माध्यमातून युद्धानंतर स्वर्गलोकामध्ये भारतीय सैनिक व पाकिस्तानी सैनिक पोहोचतात त्यांच्यामधील संवाद माध्यमातून त्यांनी वास्तवाचे दर्शन घडविले. औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी 'कब होगी सुबह' या लघुनाटिकेच्या माध्यमातून युवक- युवतींनी राष्ट्रीय एकात्मता, सुराज्यकरण, नोटाबंदी, भ्रष्टाचारचे दर्शन उपस्थितांना दाखविले तर केरळ येथील श्री शंकराचार्य विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी स्टेजवर हुबेहूब फळांचे मार्केट उभे करून लॉटरी तिकीट माध्यमातून माणुसकीचे दर्शन उपस्थितांना दाखविले.

विद्यार्थ्यांनी आपल्या लघुनाट्यांना उत्तम वेशभूषा व पूरक नेपथ्याची जोड देत त्यांच्या एकूणच प्रगल्भ सामाजिक व राजकीय जाणिवेचे दर्शन उपस्थितांना घडविले. हसत-हसवत, कधी एखाद्या व्यंगावर बोट ठेवत तर कधी तिरकस कोपरखळ्या मारत आपला संदेश लोकांच्या गळी उतरविण्याचे विद्यार्थ्यांचे कौशल्य या स्पर्धेतून प्रत्ययास आले. बहाने, [illegible], कब होगी सुबह, दो जासूस, हम नहीं सुधरेंगे, इन्सान ही इन्सान को मारता है, स्वर्ग-नरक आदी लघुनाट्यांतून नोटा बंदी, संविधानाचे महत्त्व, पैसा व प्रेम यांतील संघर्ष, लोकशाहीचे महत्त्व आदींसह ताज्या सामाजिक-राजकीय घडामोडींवर भाष्य केले.

मानव्य विद्या सभागृहात आज सकाळी स्पॉट पेंटिंग व स्पॉट फोटोग्राफीची स्पर्धा घेण्यात आली. दोन्ही स्पर्धेत प्रत्येकी पंधरा स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. स्पॉट पेंटिंग स्पर्धेसाठी 'आपल्या आसपासचे सर्वसाधारण जीवन' असा विषय देण्यात आला होता. या कलाप्रकारामध्ये दैनंदिन जीवनावर प्रकाश टाकणारे चित्र असा विषय देण्यात आला होता. या प्रकारामध्ये १५ विद्यापीठांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये नदीवर म्हशी धुणारा शेतकरी, नदीची पूजा करणारी युवती, पहाटपरीवरील गप्पा, ग्रामीण भागातील सकाळची दिनचर्या, योगा क्लास अशा विविध ठिकाणची दिनचर्या युवकांनी आपल्या कुंचल्याच्या माध्यमातून कागदावर साकारल्या. सकाळी हे अनोख्या कलाकृती पाहण्यासाठी विद्यार्थ्यांसह नागरिकांनी विद्यापीठात मोठी गर्दी केली होती.

स्पॉट फोटोग्राफीसाठी ११ विद्यापीठांनी सहभाग नोंदविला होता. स्पॉट फोटोग्राफीसाठी झाडांची रचना हा विषय देण्यात आला होता. यावेळी विद्यापीठ परिसरात प्रत्येक विद्यार्थी विविध प्रकारातील (अँगल) मधील छायाचित्रे काढत होते.

इतरांपेक्षा आपला फोटो कसा सरस ठरविण्यासाठी प्रत्येक जण धडपत होता. त्यांची फोटोग्राफी आवड पाहून अन्य विद्यार्थ्यांनासुद्धा फोटोग्राफीबाबत कुतूहल निर्माण झाले होते.

संगीत विभाग पाठीमागील तलाव, भाषा भवनमागील तलाव, गेस्ट हाऊस पाठीमागील झाडी, जुन्या कारंजा परिसरात फोटो काढण्यासाठी विद्यार्थ्यांची धडपड सुरू होती.



महोत्सवात मला पहिल्यांदाच भारतीय संस्कृतीचे दर्शन झाले. अनेक राज्यांतील मुला-मुलींशी चांगली मैत्री झाल्याने नवीन सवंगड्यांच्या सोबतीसह नवीन संस्कृती पाहायला मिळाली.

- प्राची दुबे, दीनदयाल उपाध्याय, गोरखपूर युनिव्हर्सिटी, उत्तर प्रदेश



महोत्सवात मला नवी ऊर्जा मिळाली तसेच एक नवी प्रेरणा घेऊन मी येथून परत जात आहे. येथील आठवणी माझ्यासोबत आयुष्यभर राहतील.

- आनंद विश्वनाथ, कालीकत युनिव्हर्सिटी, केरळ

# अनुभवातून शिकलो

## तरुणाईच्या भावना; महोत्सवात रमलो

कोल्हापूर : राष्ट्रीय महोत्सवाला साजेसा असा शिवाजी विद्यापीठाचा परिसर आहे. बहुतांश राष्ट्रीय महोत्सव हे राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी होतात. मात्र, यावर्षीचा महोत्सव चांगल्या पद्धतीने कोल्हापुरात झाला. 'शिवोत्सव'मध्ये आम्ही रमलो शिवाय यातून अनुभवातून शिकायला मिळाले, अशा भावना महोत्सवातील सहभागी तरुणाईने सोमवारी व्यक्त केल्या.



अस्मिता भारती (औरंगाबाद)



अभिजित चव्हाण (कोल्हापूर)



आफ्रिन अली (अमरावती)



अनामिका नाथ (राजस्थान)

त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादची विद्यार्थी अस्मिता भारती म्हणाली, मेहनत करून आम्ही महोत्सवात कला सादर केली. इतर राज्यांतील विद्यार्थ्यांची तयारी पाहिली. त्यातून आम्ही कुठे आहोत हे समजले. महाराष्ट्रातील हा महोत्सव कोल्हापूरच्या आदरातिथ्याने आगळा-वेगळा ठरला. शिवाजी विद्यापीठातील अभिजित चव्हाण म्हणाला, विविध राज्यांतील संस्कृती या महोत्सवातून पाहायला मिळाली. बाहेरून आलेल्या स्पर्धकांना सहकार्य केल्याचा आनंददेखील मिळाला. संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावतीची विद्यार्थी आफ्रिन अली म्हणाली, यापूर्वीचे महोत्सव अन्य राज्यांमध्ये झाले. यावर्षीचा कोल्हापुरात झाल्याचा विशेष आनंद आहे. अन्य राज्यांतून 'शिवोत्सव'मध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांना कोल्हापूरचे वातावरण आवडले. राजस्थानच्या वनस्थळी विद्यापीठाची अनामिका नाथ हिने या महोत्सवातून आपुलकी, स्नेह काय असते ते समजले. महोत्सवातील प्रमुख पाहुण्यांपासून सूत्रसंचालन करणारे आणि विद्यापीठातील विद्यार्थी, कर्मचाऱ्यांनी हिंदी, इंग्रजीमध्ये संवाद साधल्याने कोणतीही अडचण आली नाही. कोल्हापुरात कलेला प्रचंड दाद मिळत असल्याचे दिसून आले. त्यामुळे महोत्सवाच्या निमित्ताने याठिकाणी पुन्हा कला सादर करण्यास निश्चितपणे आवडेल.

संकलन : **संतोष मिठारी, प्रदीप शिंदे, आयुब मुल्ला**

सर्व छायाचित्रे : **दीपक जाधव**

# विद्यापीठाला नवीन ज्ञान, माहिती मिळाली

कोल्हापूर : आठ वर्षांनंतर शिवाजी विद्यापीठात 'शिवोत्सव'च्या माध्यमातून राष्ट्रीय पातळीवरील युवा महोत्सव झाला. त्यातून विद्यापीठाचे शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना काही नवीन ज्ञान-माहिती निश्चितपणे मिळाल्याचे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सांगितले.

डॉ. गुरव म्हणाले, विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांतील नवोदित कलाकार, कोरिओग्राफर, प्रशिक्षकांना कला, नाट्य, नृत्य, गायन आदी क्षेत्रांतील देशभरातील ज्ञान मिळाले. या क्षेत्रातील नवीन कल, बदल एकाच ठिकाणी माहिती मिळाली. कलाक्षेत्रातील तरुणाईच्या नवकल्पनांचे दर्शन घडले. महोत्सवासाठी विद्यापीठाला विविध महाविद्यालयांनी मदतीचा हात दिला. त्यात भारती विद्यापीठ, डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, रयत शिक्षण संस्था, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, केआयटी कॉलेज, अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आरआयटीई कॉलेज, डीकेटीई कॉलेज, यशोदा टेक्निकल इन्स्टिट्यूट, डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज, कासेगाव एज्युकेशन सोसायटी, संजय घोडावत ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, शरद इन्स्टिट्यूट आदींनी मदतीचा हात दिला.

# शिक्षणासाठी काश्मीरची तरुणाई झगडतेय

कोल्हापूर : काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्यामुळे गेल्या सहा महिन्यांपासून कॉलेजला जाता आले नाही. मात्र, इंटरनेट आणि मित्र-मैत्रिणींकडून माहिती घेऊन केलेली मेहनत आणि निव्वळ जिद्दीच्या जोरावर राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागी झाल्याचे काश्मीर विद्यापीठाची विद्यार्थिनी अरुणा खान हिने सांगितले. शिक्षण घेऊन भविष्य घडविण्यासाठी काश्मीरची तरुणाई झटत असल्याचेही तीने सांगितले.

ती म्हणाली, सहा दिवस जीव मुठीत घेऊन बसचा प्रवास करुन कानपूरमधील महोत्सवात सहभागी झाली होती. कोल्हापूर, महाराष्ट्राबद्दल काहीच माहीत नाही. मात्र, याठिकाणी आल्यानंतर इथल्या लोकांचा स्वभाव आवडला. (प्रतिनिधी)

## अंबामाता का दर्शन जरूर करुंगी : गौरी ठाकूर

युनिव्हर्सिटी ऑफ जम्मूची गौरी ठाकूर हिने जम्मू आणि काश्मीरमधील परिस्थितीत मोठा फरक आहे. याठिकाणी आम्ही निर्भयपणे जीवन जगत आहोत. 'यहाँ की अंबामाता का मंदिर और कोल्हापुरी जूतों के बारे में सुना है. अब अंबामाता का दर्शन जरूर करुंगी और कोल्हापुरी जूता लेकर जाऊंगी.

## विविध लोकनृत्यांचा समावेश

पारंपरिक तालवाद्ये, चर्मवाद्यांचा वापर हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य ठरले. सर्पन कुल्लाल, दांडिया रास, डप्पू नृत्य, लांगुरिया, भवाई, रायबेन्शे, हरियाणवी, डोल्लू कुनिथा, बरसाती नृत्य, दक्षिण गुजरातच्या डांग व कपराडा भागातील आदिवासी नृत्य, मणिपुरी शिम लाम नृत्य, राजस्थानचे मंजिरा नृत्य, पंजाबी भांगडा आदी लोकनृत्य स्पर्धकांनी सादर केली. यात चंदीगडच्या पंजाब युनिव्हर्सिटीच्या संघाने चित्तथरारक प्रात्यक्षिक सादर केले.

## कलाकारांना परतीचे वेध

महोत्सवात चार दिवस धमाल केल्यानंतर सोमवारी रात्री स्पर्धकांना परतीचे वेध लागले. लोकनृत्य, लघुनाटिका, लोककला वाद्यवृंद आदींसाठी आणलेले साहित्य वाहनांमध्ये भरण्याची त्यांची लगबग सुरू होती. या महोत्सवातील मिळालेल्या नव्या मित्र-मैत्रिणींसमवेत रात्री उशिरापर्यंत त्यांच्या गप्पा रंगल्या होत्या.

# दृष्टिहीन 'अभयकुमार' च्या नकलांनी रसिक भारावले

## दोस्तों के आँखों से दुनिया देख लेता हूँ

कोल्हापूर : 'शिवोत्सव'मधील नकलांच्या स्पर्धेत उत्तर प्रदेशच्या बनारस हिंदू विद्यापीठाचा अंध विद्यार्थी अभयकुमार शर्मा याच्या सादरीकरणाने उपस्थित भारावून गेले. उत्तम कलेचे सादरीकरण करून त्याने रसिकांची मने जिंकली.



अभयकुमार शर्मा (उत्तरप्रदेश)

शर्मा याने मंगळवारी होणाऱ्या 'व्हॅलेंटाईन डे'चा आधार घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाजात नव्या 'प्रेमविषयक' घोषणांचे सादरीकरण केले. त्यांचा आवाज आणि सभेतील जनतेच्या टाळ्यांतून निघणारा आवाज काढला. त्यावर त्याची अनेकांनी गळाभेट घेत त्याचे कौतुक केले. दरम्यान, 'शिवोत्सव'बाबत त्याने सांगितले की, कोल्हापूर आणि शिवाजी विद्यापीठात प्रवेश करताच मन प्रसन्न झाले. हा महोत्सव मित्रांच्या डोळ्यांनी पाहायचास मिळाला. इतकी त्याची मैत्री दृष्टी आहे. दोघांमध्ये जे-ते स्पर्धात्मक कार्यक्रम झाले आहेत. अत्यंत पूरक आणि सकारात्मक असा महोत्सव भरला आहे. याबाबत त्याने तो म्हणाला, 'ना मैं किसी मुसीबत में फंसना, न औरों को फसना चाहता हूँ, बल्कि स्वयं हंसना और औरों को हंसाना चाहता हूँ!' दृष्टीबाबत तो म्हणतो की, 'कम सुरा, कभी बहुत बढ़िया देख लेता हूँ, मैं दोस्तों के आँखों से दुनिया देख लेता हूँ!'

**समारोप आज :** ३२ वा राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय 'शिवोत्सव' युवा महोत्सव

# लोकनृत्याने उडविली धमाल

कोल्हापूर : लक्षवेधक शास्त्रीय नृत्य, विविध सामाजिक विषयांना स्पर्श करणाऱ्या लघुनाटिका, पोट धरून हसायला लावणाऱ्या नकलांनी सोमवारी रंगत गेलेल्या 'शिवोत्सव'मध्ये सायंकाळी धडाकेबाज लोकनृत्यांनी धमाल उडविली. एकाहून एक असे सरस सादरीकरण करत स्पर्धक संघांनी उपस्थितांना भारतीय लोकसंस्कृतीचे दर्शन घडविले. महोत्सवातील अखेरचा दिवस लोकनृत्यांनी गाजविला. 'शिवोत्सव'चा आज, मंगळवारी बक्षीस वितरणाने समारोप होणार आहे.

'शिवोत्सव' या ३२ व्या आंतरविद्यापीठीय राष्ट्रीय युवा महोत्सवातील कला सादरीकरणासाठीच्या अखेरच्या दिवशी सोमवारी सकाळच्या सत्रात एकल शास्त्रीय नृत्य, लघुनाटिका, रांगोळी आदी कलाप्रकार झाले. तरुणाईला दुपारच्या सत्रातील नकला आणि लोकनृत्याचे वेध लागले होते. सायंकाळी पाच वाजता सुरू होणारी नकलांची स्पर्धा एक तास आधी सुरू झाली. यातील स्पर्धकांनी राजकीय नेतेमंडळी, सिनेकलाकार, नायक-खलनायक आदींच्या नकला सादर करीत उपस्थितांना पोट धरून हसविले. येथील कलाविष्कार पाहून अनेकांची पावले लोककला केंद्राकडे वळली. लोकनृत्य सुरू होण्यापूर्वीच सभागृह खचाखच भरून गेले. सायंकाळी सहाच्या सुमारास छत्तीसगडच्या पंडित रविशंकर शुक्ला युनिव्हर्सिटी संघाच्या सावन आदिवासी नृत्याने या कलाप्रकाराच्या स्पर्धेला सुरुवात झाली. कर्नाटकमधील युनिव्हर्सिटी ऑफ म्हैसूरच्या कलाकारांनी डोलीनृत्य सादर करून परंपरेचे दर्शन घडविले. केरळा युनिव्हर्सिटीने सर्पम कुल्ल, तर आंध्र प्रदेशच्या कृष्णा युनिव्हर्सिटीने डप्पू नृत्याने उपस्थितांना डोलायला लावले. वीर नर्मदा साऊथ गुजरात युनिव्हर्सिटीच्या संघातील कलाकारांनी डांगी आदिवासी नृत्यातून योगासनातील विविध प्रकार सादर करून उपस्थितांना थक्क केले. गणपत युनिव्हर्सिटीच्या संघाने रासलीलातून गुजरातची लोकपरंपरा दाखविली. कुरुक्षेत्र विद्यापीठाच्या संघाने हरियाणी नृत्यातून देशप्रेम, भक्तीचे दर्शन घडविले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने बहारदार कोळी नृत्य सादर केले. पंजाबमधील भांगडा लोकनृत्यांवर उपस्थितांनी धमाल केली. पारंपरिक वेशभूषा, वाद्ये आणि साधनांचा वापर करत विद्यार्थी कलाकारांनी लोकनृत्याच्या स्पर्धेत रंग भरला. शिवाय उपस्थितांची मने जिंकली. प्रत्येक सादरीकरणाला टाळ्या, शिट्ट्यांच्या गजरात दाद मिळत राहिली. काहींनी सभागृहाबाहेरील आवारात नृत्याचा फेर धरला. दरम्यान, गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या महोत्सवात सोमवारी सायंकाळनंतर काहीसा विस्कळीतपणा दिसून आला. यात अचानकपणे नकलांची वेळ बदलण्यात आली. लोकनृत्य पाहण्यासाठी लोककला केंद्रात तुडुंब गर्दी झाली होती. यात काहीजणांचा हुल्लडपणा सुरू झाला. त्याचा त्रास अन्य प्रेक्षकांना झाला.




शिवाजी विद्यापीठातील ३२ व्या आंतरविद्यापीठीय राष्ट्रीय 'शिवोत्सव' या युवा महोत्सवात सोमवारी लोकनृत्यांनी धमाल उडविली. यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संघाने बहारदार कोळीनृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

## सयाजी शिंदे यांची आज प्रमुख उपस्थिती

'शिवोत्सव'चा समारोप आज, मंगळवारी सकाळी साडेदहा वाजता होणार आहे. विद्यापीठाच्या लोककला केंद्रातील या कार्यक्रमास अभिनेते सयाजी शिंदे, जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी, भारती विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक एस. के. शर्मा प्रमुख उपस्थित असणार आहेत.



कुरुक्षेत्र विद्यापीठाच्या कलाकाराचे हरियाणी नृत्य



चंदीगडच्या पंजाब युनिव्हर्सिटीच्या संघाने चित्तथरारक प्रात्यक्षिकांसह नृत्य सादर केले.

## तीन सर्वसाधारण विजेतेपद

महोत्सवातील विविध कलाप्रकारांच्या स्पर्धेतून गुणांच्या आधारावर तीन सर्वसाधारण विजेतेपद दिली जाणार आहेत. त्यासह २६ कलाप्रकारांत प्रथम, द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात येईल. त्यातील पहिल्या क्रमांकाचे विजेते दक्षिण अशियाई आंतरविद्यापीठ महोत्सवात सहभागी होतील.

## सुमारे ३ हजार चपात्या, ११० किलोंचा भात

महोत्सवातील सहभागी स्पर्धक, त्यांचे संघव्यवस्थापक, परीक्षक, विद्यापीठातील अधिकारी आणि कर्मचारी अशा सुमारे दीड हजार लोकांच्या भोजनाची व्यवस्था विद्यापीठाने केली होती. अॅनेक्स बिल्डिंगसमोर भोजन कक्ष उभारण्यात आला होता. याठिकाणी एकवेळच्या जेवणासाठी १३० किलो पिठाच्या सुमारे ३ हजार चपात्या, ११० किलोंचा भात, १६० किलो भाजी आदी साहित्य लागत असल्याची माहिती भोजन समितीचे समन्वयक डॉ. पी. एन. भोसले यांनी दिली.

# लोककलांनी जल्लोष टिपेला

## शास्त्रीय नृत्य, लघुनाटिका आणि लोकगीतांनी गाजविला चौथा दिवस

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

**शिवोत्सव**

मणिपुरी, ओडिसा, कथ्थक, भरतनाट्यम्, कुचीपुडी अशा अभिजात नृत्यांच्या ठेव्यावरील पदन्यास, रंगरेषातून अवतरलेले बोलके ग्रामीण जीवनाचे चित्रण, रांगोळीतून केलेली उधळण आणि लघुनाटिकांतील कसदार अभिनयातून सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक जीवनावर टाकलेला प्रकाशझोत... त्यातच जबरदस्त परंपरागत बाज घेऊन आलेली लोकनृत्ये अशा विविधुंगी सादरीकरणाला मिळालेली टाळ्या-शिट्यांची उत्स्फूर्त दाद... अशा जल्लोषी वातावरणात आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये (शिवोत्सव) चौथ्या दिवशी विद्यार्थ्यांचा जल्लोष टिपेला पोहोचला. शास्त्रीय नृत्य, कुंचल्यातून रेखाटलेले चित्र आणि सोबतीला मुक्त फोटोग्राफी स्पर्धेमुळे महोत्सव उत्तरोत्तर रंगतदार होत गेला. सूर, लय, तालाच्या हिंदोळ्यावर सलग चार दिवस प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करत स्पर्धकांनी वाहवा मिळवली. सायंकाळी लोककला केंद्रात झालेल्या लोकसंगीत आणि अदिवासी कार्यक्रमाने महोत्सवामध्ये अधिक रंगत भरली.





कृष्णा युनिव्हर्सिटी, आंध्र प्रदेश





### पदन्यासाचा झंकार

संगीतशास्त्र व नाट्य विभागात झालेल्या शास्त्रीय नृत्याच्या स्पर्धेतून अभिनयाबरोबरच पदन्यासाचा झंकार उमटला. ताल, लय यांचा सुरेख मिलाफ साधत अभिनय कौशल्य सादर करत प्रेक्षकांची वाहवा मिळवली. केवळ दहा मिनिटात भारतीय संस्कृतीतील मणिपुरी, ओडिसी, कथ्थक, कथ्थकली, भारतनाट्यम् व कुचीपुडी या शास्त्रीय नृत्याचा आविष्कार सादर केला. एकापेक्षा एक सरस नृत्य प्रकारांनी स्पर्धेचा स्तर दिसून आला. नागपुरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या श्रद्धा हेरवाडेने कथ्थक नृत्यावर केलेला पदन्यास प्रेक्षकांवर मोहिनी टाकणारा होता. त्याचीच पुनरावृत्ती बंगळुरु युनिव्हर्सिटीच्या अबिदाने मोहिनीअट्टम नृत्य प्रकारात केली. केरळच्या शंकराचार्य युनिव्हर्सिटीच्या पी. माधुरीने भरतनाट्यम् प्रकार सादर करत प्रतिभा दाखवून दिली. तर तिरुपती येथील पद्मावती महिला युनिव्हर्सिटीच्या स्पर्धकाने मणिपुरी प्रकारात शास्त्रीय नृत्याचा कलाविष्कार सादर केला.



### कुंचल्यातून रेखाटल्या रेषा

रंगांची अमर्याद उधळण करत कुंचल्याच्या सहाय्याने कॅनव्हासची दुनिया समर्थपणे पेलणाऱ्या मनस्वी कलाकारांचे दर्शन युवा महोत्सवातील चित्रकला स्पर्धेत झाले. ओलेता रस्ता, कपडे, छत्र्या सावरत चाललेली शाळकरी मुले, उंच इमारती, ग्रामीण जीवनाचे यथार्थ दर्शन, स्वत:च्या पायवर उभे राहण्यासाठी विविध व्यवसाय करणारी मुले अशा अनेक कलाकृती चित्रकला स्पर्धेत पहावयास मिळाल्या. 'ग्रामीण जीवनाच्या चित्रणा'वर अधारलेल्या स्पर्धेच्या माध्यमातून प्रत्येक चित्रातून रंगांची उधळण कुंचल्यातून अवतरली. गुलबर्गा युनिव्हर्सिटीच्या सुनील सागरने उत्सवात सहभागी झालेले कुटुंब आणि बरकतुल्ला विद्यापीठाचे विजय गहरवालने शाळेला जाणाऱ्या मुलांचे चित्र स्पर्धेच्या केंद्रस्थानी होते. बनारस विद्यापीठाच्या हृपिराजने चहा टपरीचे चित्राला दाद मिळाली.



### हास्याचे फवारे आणि विसंगतीवर प्रहार

स्पर्धेचा सोमवारचा दिवस गाजवला तो वि. स. खांडेकर भाषा भवनमधील सभागृहात सादर झालेल्या लघुनाटिकांनी. देशभरातून आलेल्या विद्यापीठांनी नाटिकेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न, बदललेले राजकारण आणि संगतीचा परिणाम नेकमेपणाने सादर करत सभागृहात हस्याचे फवारे निर्माण केले. तर कधी बोचरी टीका करत उपस्थितांना आत्मपरीक्षण करण्यासही भाग पाडले. 'मुर्गी कटी है, तो सबमें बटी है' या नाटिकेच्या माध्यमातून भ्रष्टाचारावर प्रहार करत संविधानाचे महत्त्व अधोरेखित केले. राजस्थानच्या बनारस युनिव्हर्सिटीने केलेली नाटिका चांगलीच भाव खाऊन गेली. तर रांची युनिव्हर्सिटीने 'बहाने' नाटिकेच्या माध्यमातून संगतगुणावर प्रकाशझोत टाकला. असंगताची संगत केल्यास दुर्गुणाची रेलचेल होते, अशा स्वरुपाचे पौराणिक व सध्याचे जीवन रेखाटले. त्याला दर्जेदार अभिनय कौशल्याची जोड दिली. त्यामुळे संपूर्ण दहा मिनिटे सभागृह हस्स्यात बुडून गेले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यपीठाने परिवर्तनाची साद घालत 'कब होगी सुबह' नाटिका सादर केली.

### अभिनेते सयाजी शिंदे यांच्या उपस्थितीत आज समारोप

महोत्सवाची सांगता आज, मंगळवारी सकाळी साडेदहा वाजता होणार आहे. प्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे यांच्या जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे. यावेळी विजेत्या संघांना पारितोषिक वितरण होणार आहे. लोककला केंद्रात हा कार्यक्रम होणार आहे. बनारस हिंदू विद्यापीठाचे निरीक्षक प्रा. एस. के. शर्मा व एआययूचे डॉ. डेव्हिड सॅम्पसन यांची प्रमुख असतील.




### रांगोळीचे सौंदर्य

रांगोळी म्हणजे नुसती रंगांची उधळण नव्हे. मांगल्य, पवित्र्य, सौंदर्याचा अविष्कार रंग व रेषांच्या मिलाफामागे शास्त्रही आहे. बिंदू, रेषा, अर्धवर्तुळ, वर्तुळ, स्वतिक, शंख, चक्र, गदा, दीप आदी चिन्हांना जसे अंगभूत सौंदर्य आहे. शतकानुशतके घराघरात पहायला मिळणाऱ्या कलेविषयीची आस्था, परंपरा आणि प्रेमाची माहिती रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून प्रेक्षकांना मिळाली. पारंपरिक विषयाला अनेक ठिपक्यांच्या सहाय्याने जोडलेल्या रांगोळीमध्ये रंगाची मुक्त उधळण केली होती. कुमारी डॉली, दिव्या पोलवाल, शांती, अनामिका राणी आणि गजेंद्रसिंह यांनी रेखाटलेल्या रांगोळ्या भारतीय परंपरेचे दर्शन घडले. त्यामुळे संगीतशास्त्र व नाट्य विभागीतील व्हरांडे रेखाटलेल्या रांगोळ्यामुळे रंगीबेरंगी झाले होते.

# आदिवासी नृत्याचा दमदार कलाविष्कार

## युवा महोत्सवाची आज सांगता; अभिनेते सयाजी शिंदे यांची उपस्थिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

- थरारक, अप्रतिम अन् दिलखेचक सादरीकरण
- 'नाद खुळा'ची कोल्हापुरी दिलखुलास दाद

पारंपरिक वाद्यांच्या लयीला साजेशी वेशभूषा आणि तितक्याच ताकदीने सादर झालेल्या आदिवासी नृत्यांच्या दमदार कलाविष्काराने सोमवारी अवघ्या तरुणाईच्या उत्साहाला उधाण आले. थरारक, अप्रतिम आणि दिलखेचक आदिवासी लोककलांच्या या सादरीकरणाला टाळ्या, शिट्ट्यांचा क्षणाक्षणाला वर्षाव होत होता. शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रातील अख्खी गर्दी क्षणाक्षणाला 'नाद खुळा' अशी कोल्हापुरी दिलखुलास दाद देत उभे राहून कलाकारांना प्रोत्साहन देत असलेले दुर्मीळ क्षण सायंकाळी दिसून आले. 'शिवोत्सव' महोत्सवात स्पर्धेतील आजचा अखेरचा दिवस या कार्यक्रमाला चार चाँद लावून गेला.

छत्तीसगढच्या विद्यार्थ्यांनी लोकसंस्कृतीचे अनोखे दर्शन सुरुवातीलाच सादर केले. त्यांच्या मोर नृत्याने रसिकांवर मोहिनी घातली. म्हैसूर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी अंगावर घोंगडीचे आकर्षक वेश परिधान करून सादर केलेला नृत्याविष्कार दमदार होता. केरळच्या मुलींच्या संघाने सादर केलेल्या केरळी नृत्याने तर कार्यक्रमाची उंची वाढवली. आंध्र प्रदेशच्या संघाने डफ वाजवून सादर केलेल्या नृत्यालाही दाद मिळाली.

आजच्या कार्यक्रमाला श्रीमंती बहाल केली ती गुजरातच्या किर विद्यापीठाच्या आदिवासी नृत्याने. क्षणाक्षणाला थक्क करायला लावणारे मानवी मनोरे आणि अचंबित करणाऱ्या या संघाला सलग दहा मिनिटे टाळ्यांचा कडकडाट मिळाला. यानंतर सादर करण्यात आलेले नृत्याविष्कारही चित्तवेधक होते. आज अखेरचा दिवस असल्याने सर्व कार्यक्रम पाहण्यासाठी तुडुंब गर्दी होती. अखेरच्या दिवशी वेळेच्या नियोजनातील गोंधळ आणि हुल्लडबाजांमुळे उपस्थितांना नाहक त्रास सोसावा लागला. नियोजनातील फोलपणा आज दिसून आला.

बनारस हिंदू विद्यापीठाच्या अभयकुमार शर्मा या अंध विद्यार्थ्याने राजकीय व्यक्तींची नक्कल सादर करीत उपस्थितांकडून टाळ्या मिळवल्या.

दरम्यान, युवा महोत्सवाची मंगळवारी पारितोषिक वितरणाने सांगता होईल. अभिनेते सयाजी शिंदे, जिल्हाधिकारी डॉ. अमिती सैनी यांची उपस्थिती असणार आहे.




कोल्हापूर : आदिवासी लोककला प्रकारात म्हैसूर विद्यापीठाने असा चित्तथरारक मानवी मनोरा साकारला होता. (छाया : तय्यब अली)

### चार हजार विद्यार्थ्यांच्या आहाराची रोज व्यवस्था

यूथ फेस्टिव्हलसाठी देशभरातून ८२ विद्यापीठांचे विद्यार्थी, प्रशिक्षक यांची उपस्थिती होती. सर्व विद्यार्थी व प्रशिक्षक यांची एकवेळची संख्या सुमारे २ हजार होती. या सर्वांच्या आहाराची व्यवस्था विद्यापीठ प्रशासनाने केली.


## श्री गजानन महाराज संस्थान, शेगांव, जि. बुलडाणा

### -: जाहिर निमंत्रण :-

दरवर्षी प्रमाणे यावर्षी श्रींचा १३९ वा प्रगटदिनोत्सवास दि. ११/०२/२०१७ पासून प्रारंभ होऊन नित्याचे कार्यक्रमानुसार दि. १८/०२/२०१७ रोजी श्री प्रगटदिनोत्सव संपन्न होईल. आपण सर्वांनी उत्सवात सर्वतोपरी सहभागी व्हावे ही विनंती.

श्री प्रगटदिन उत्सवा निमित्य वैयक्तीक व सामुहिक पारायण करणे महत्वाचे. आयोजकांनी शुध्द हेतूने सेवा द्यावी. शक्यतो आपल्या पध्दतीने प्रसाद व महाप्रसाद वितरीत करण्यात यावा. श्रींच्या नावाने गैरप्रकार होता कामा नये. होत असल्यास सतर्क रहावे ही विनंती.

**नम्र सुचना :-** मंदिर परिसरात गर्दी होईल हे लक्षात घेऊन वन-वे (एकेरी मार्ग) करण्यात आला आहे. त्यात दर्शनबारी व श्रीमुख दर्शनबारी, महाप्रसाद, श्रींचा पारायण मंडप, श्रींची गादी, पलंग व तसेच औदुंबर दर्शनाची व्यवस्था केली आहे.

### * निवास व्यवस्थेबाबत *

- **श्री मंदिर परिसर भ.नि.क्र. १ व २ :** फोन नं. ०७२६५-२५२०१८ विस्ता क्र. १६९ मो.नं.९४२३८४०८५२
- **भ.नि. संकुल परिसर, भ. नि. क्र. ३, ४, ५ व ६ :** फोन नं. ०७२६५-२५२०१८, विस्तार क्र. ५००/५०५/५०७ मोबा. ९८५०८५०८९१ / ९४२३१४४७०९
- **आनंदविहार भ. नि. संकुल परिसर :** फोन नं. ०७२६५-२५२०१९, मोबा. ९६५७४४९४९६/७५८८५६५६९९
- **आनंदसागर विसावा भ. नि. संकुल :** फोन नं. ०७२६५-२५३०१८, मोबा. ९६५७४४९४९५
- **आनंदसागर चौकशी कक्ष :** फोन नं. ०७२६५-२५४९९१

वरील सर्व ठिकाणी भाविकांच्या सोयीकरीता असलेल्या खोल्या नियमानुसार उपलब्ध होऊ शकतात.

- शेगांवी आलेवर खोली करीता भूलथापा दिल्या जातात. त्यावर विश्वास ठेवू नये. संस्थेशी संपर्क साधावा, ही विनंती.

**टिप :** ज्यांना कार, बसने शेगांवी दर्शनास यावाचे आहे. त्यांनी अगोदर वरील फोन नंबरवर निवासाबाबत चौकशी करून जवळच्याच अकोला, खामगांव, नांदुरा येथे राहण्याची व्यवस्था करून घ्यावी, तेथून १ तासाचे आत आपण शेगांवी येऊ शकता, म्हणजे होणारा त्रास वाचेल.

- भक्तांनी भक्त निवासामध्ये खोली घेतेवेळी संस्थानच्या नियमाप्रमाणे व कोणतेही शासकीय एक / दोन ओळखपत्र सादर करणे आवश्यक राहील.

व्यवस्थापकीय विश्वस्त

# 'शिवोत्सव'मध्ये कलेचा संगम

## विद्यापीठातील वातावरण बनले कलामय; सभागृह हाऊसफुल्ल

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

**शास्त्रीय नृत्यातील हावभाव, ताल, अभिनयाचा अनोखा मिलाफ, लघुनाटिकेच्या माध्यमातून राजकीय, सामाजिक विषयांवर केलेले विडंबन, विविध प्रांतांची संस्कृती दर्शविणाऱ्या रांगोळी अशा विविधांगी कलाविष्कारांचे दर्शन घडवीत 'शिवोत्सव' आंतरविद्यापीठ युवा महोत्सवात युवकांच्या सळसळत्या उत्साहामुळे रंगत वाढली आहे.**





**कोल्हापूर : १) लघुनाटिका स्पर्धेतील 'लॉटरी तिकीट' या लघुनाटिकेतील प्रसंग. २) शास्त्रीय नृत्य स्पर्धेत 'कुचीपुडी' नृत्य सादर करताना पद्मावती महिला विश्व विद्यालयाची विद्यार्थिनी. ३) शंकराचार्य संस्कृत विद्यापीठ केरळच्या विद्यार्थिनीने सादर केलेले 'मोहिनी अट्टम्' हे शास्त्रीय नृत्य. (छाया : तय्यब अली)**

लोककला केंद्र, वि. स. खांडेकर भाषा भवन येथील सभागृह हाऊसफुल्ल झाले असून, विद्यापीठातील वातावरण 'कलामय' बनले आहे. आंतरविद्यापीठ युवा महोत्सवात सोमवारी सकाळी संगीत व नाट्यशास्त्र विभागात 'ट्रेडिशन' या विषयावर रांगोळी स्पर्धा झाली. दयालबाग युनिव्हर्सिटी, आग्राच्या कुमारी डॉलीने मध्य प्रदेशची संस्कृती, गुजरात खेमला युनिव्हर्सिटीच्या शिल्पा तिवारीने वारली आर्ट, संस्कार भारती रांगोळी काढून पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडविले. मानव्यशास्त्र विभागात 'रूटीन लाईफ राऊंड अस' या विषयावर झालेल्या स्पॉट पेंटिंग स्पर्धेत कलाकारांनी प्रतिभेची चुणूक दाखवून दिली. बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या ऋषीराजने 'चहाची टपरी', गुलबर्गा युनिव्हर्सिटीच्या सुनील सागरने उत्सवात सहभागी झालेले कुटुंब, बरकतुल्ला युनिव्हर्सिटी भोपाळच्या विजय गहरवारने शाळेत जाणाऱ्या मुलांचे चित्र रेखाटले.

संगीत व नाट्यशास्त्र विभागात शास्त्रीय नृत्य स्पर्धा झाली. कथक, कथकली, भरतनाट्यम्, मणिपुरी, कुचीपुडी, मोहिनी अट्टम्, ओडीसी नृत्य सादर करीत युवतींनी ताल, लय, तंत्र, हावभाव, पोशाख, पदन्यास यांचा अनोखा मिलाफ दाखवून दिला. बेंगलोर युनिव्हर्सिटीच्या मोहिनी अट्टम् नृत्य सादर केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूरच्या श्रद्धा हेरवाडेने भरतनाट्यम् नृत्य सादर करीत टाळ्यांची दाद मिळविली. शास्त्रीय नृत्य स्पर्धेत १५ कलाकार सहभागी झाले होते.

वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात लघुनाटिका (स्कीट) स्पर्धा झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादच्या कलाकारांनी 'कब होगी सुबह' नाटिकेतून भ्रष्टाचार, अनागोंदी, अनिष्ट रूढी-परंपरा, जातीयवादावर राजकीय विडंबनाच्या माध्यमातून टीकात्मक भाष्य केले. श्री. शंकराचार्य संस्कृत युनिव्हर्सिटी, केरळाने 'लॉटरी तिकीट' ही एकांकिका सादर केली. केरळच्या महात्मा गांधी युनिव्हर्सिटीने 'इंडियन रूपी' नाटिकेतून नोटाबंदीमुळे सामान्य माणस कुटुंबाला झालेला त्रास दाखविला. पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या कलाकारांनी 'दो जासूस' विनोदी अंगाने सादर करीत सभागृहातील उपस्थित प्रेक्षकांना खळखळून हसविले. कॉमनमॅन, शकुनी मामा, देवदास ही पात्रे रंगवीत भ्रष्टाचार, जातीयता नाकारून नवा भारत घडविण्याचे स्वप्न रंगविले. झारखंडच्या रांची युनिव्हर्सिटीने 'बहाने' एकांकिकेतून वाईटाच्या संगतीने माणूस वाईटच बनतो हा संदेश दिला. वनस्थळी विद्यापीठाने 'मुर्गी कटी है, तो सबमें बटी है' एकांकिकेतून राजकीय नेते सामान्यांची कशाप्रकारे फसवणूक करतात हे दाखवून दिले. प्रेक्षकांकडून मिळणाऱ्या टाळ्या-शिट्यांची दाद, उत्स्फूर्त प्रतिसादाने कलाकार भारावून गेले होते.